**(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**मुंबई न्यायमंडळाच्या उच्च न्यायालयात**

**फौजदारी अपिलीय न्यायाधीकारक्षेत्र**

**फौजदारी अपील क्र. ३४६/१९९८**

विलास बाजीराव जाधव

वय सुमारे २६ वर्षे,

व्यवसायःशेतकरी,

रा. तालुका कराड, जिल्हा. सातारा.

**........अपिलार्थी**

**विरुद्ध**

महाराष्ट्र राज्य

(विद्वान सरकारी अभियोक्ता, उच्च न्यायालय (ए. एस.),

मुंबई यांच्या माध्यमातून नोटीस स्वीकारली )

**........उत्तरार्थी**

*****

अपिलार्थीसाठी उपस्थित वकील: श्री. राहुल एस. काटे

राज्य/उत्तरार्थीकरिता उपस्थित सहाय्यक सरकारी अभियोक्ता : श्रीमती. शर्मिला कौशिक.

*****

**न्यायमंच : न्यायमूर्ती  संदीप के. शिंदे.**

**दिनांकः २२ फेब्रुवारी, २०२१.**

**मौखिक न्यायनिर्णय -**

१. भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३०४ भाग-॥ अंतर्गत दोषसिद्धी आणि पाच वर्षांच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेमुळे व्यथित झालेल्या सत्र प्रकरण क्रमांक २९८/१९९० मधील आरोपीने दंड प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३७४ (२) अंतर्गत हे अपील केले आहे.

२. अपिलार्थीचे विद्वान वकील आणि राज्यासाठी उपस्थित असेलेले सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे ऐकले.

३. अभियोग पक्षाचे प्रकरण थोडक्यात असे आहे की;

सुनील उर्फ अनिल चंदन शिवे (मयत) हा मेसर्स सिमेन्स कंपनीमध्ये कंत्राटी मजूर म्हणून काम करत होता. बाळासाहेब भोसले हे त्यांचे सुपरवायझर (पर्यवेक्षक) होते. २८ ऑगस्ट १९८९ रोजी त्याच्या अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली. त्यानंतर दंड प्रक्रिया संहितेच्या कलम १७४ अंतर्गत चौकशी करण्यात आली. चौकशीत, स्वतंत्र पंचांच्या उपस्थितीत मरणोत्तर पंचनामा करण्यात आला, ज्यात त्या व्यक्तीवर कोणतीही दुखापत झाल्याची नोंद घेतली गेली नाही. मयत हा कंपनीच्या आवारात काम करत असताना अचानक खाली पडला आणि त्यामुळे त्याला कंपनीच्या दवाखान्यात नेण्यात आले आणि त्यानंतर त्याला मुलुंड येथील ई. एस. आय. एस. रुग्णालयात नेण्यात आले, जिथे दाखल केल्यावर त्याला मृत घोषित करण्यात आले. बाळासाहेब भोसले (सुपरवायझर ) यांनी मयत व्यक्तीला रुग्णालयात हलवले होते. डॉ. (सौ) सीता-अभियोग साक्षीदार क्रमांक- ७ ह्या मुलुंड येथील ई. एस. आय. एस. रुग्णालयाशी संलग्न वैद्यकीय अधिकारी, ज्यांनी दाखल करतेवेळी मयत व्यक्तीची तपासणी केली होती, त्यांनी साक्ष दिली की जेव्हा मयत व्यक्तीला रुग्णालयात आणण्यात आले तेव्हा कंपनीने एक पत्र पाठवले होते ज्यात असे म्हटले

होते की सुनील चंदन शिवे (मयत) यांना चक्कर आली होती आणि उलट्या झाल्यानंतर ते खाली पडले. खरेतर, हे पत्र तपास अधिकाऱ्याने अभिलेखावर आणले नाही.

४. तथापि, शवविच्छेदन शल्यचिकित्सक डॉ. प्रकाश आंबेकर (अभियोग साक्षीदार -६) यांनी साक्ष दिली की त्यांना मयत व्यक्तीच्या अंगावर बाह्य जखमा दिसून आल्या नाहीत आणि त्यांनी मत व्यक्त केले की मृत्यूचे कारण "प्लीहा फुटल्यामुळे अंतर्गत रक्तस्त्रावामुळे गंभीर इजा झाल्याने -अनैसर्गिकरित्या" असे होते.

५. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७४ अंतर्गत चौकशीदरम्यान बालासाहेब भोसले आणि मयत व्यक्तीच्या वडिलांसह खंडू बनसोडे यांचे जबाब नोंदवण्यात आल्याचे दिसून येते. मयत व्यक्तीला कंपनीच्या दवाखान्यात आणि त्यानंतर रुग्णालयात नेणाऱ्या बालासाहेब भोसले यांची अभियोग पक्षाने अद्याप तपासणी केलेली नाही, यात शंका नाही. खरे तर तपास अभिलेखावरून असे सूचित होते की, मरणोत्तर पंचनामा सुरू असताना देखील बाळासाहेब भोसले उपस्थित होते. त्यामुळे बाळासाहेबांचा पुरावा आवश्यक होता. मात्र, त्यांची तपासणी करण्यात आलेली नाही. असे असले तरी, २८ ऑगस्ट १९८९ रोजी कंपनीच्या आवारात झालेल्या शाब्दिक वादावरून अपीलकर्ता- आरोपी जो देखील एक कंत्राटी मजूर आहे त्याने मयत व्यक्तीस ठोसा मारून हल्ला केली, जो एक प्राणघातक आघात असल्याचे सिद्ध झाले. तथापि, सुमारे सहा महिन्यांनंतर म्हणजे २३ फेब्रुवारी १९९० रोजी पोलीस उपनिरीक्षकांकडून तक्रार दाखल करण्यात आली.

६. तक्रारीचा निःसंशयपणे अभ्यास केल्याने असे सूचित होते की मयत व्यक्तीच्या वडिलांना संशय होता की त्यांच्या मुलाचा मृत्यू अपघाती नव्हता, तर त्याची हत्या झाली होती आणि त्यामुळे पुढील तपासात अशोक उर्फ पप्पु कापसे आणि खंडू शंकर बनसोडे यांचे जबाब नोंदवले गेले.

या दोन व्यक्तींपैकी अभियोग पक्षाने अशोक कापसे-अभियोग साक्षीदार -५ याची प्रत्यक्षदर्शी म्हणून चौकशी केली होती, ज्याने साक्ष दिली की त्याने हा हल्ला पाहिला होता.

७. आक्षेपित निकालावरून असे दिसते की विद्वान संपरीक्षा न्यायालयाने अशोक कापसेची (अभियोग साक्षीदार -५) साक्ष अंतिम सत्य म्हणून स्वीकारले आहे आणि त्याच्या साक्षीवर दोषसिद्धीचा पाया रचला आहे.तथापि, कलम ३०२ अंतर्गत आरोप निश्चित करण्यात आला होता.भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४ भाग-II अंतर्गत दोषसिद्धी संपुष्टात आली, कारण पुरावा असे स्पष्ट करते की हे प्रकरण भारतीय दंड संहितेच्या कलम ३०० च्या चौथ्या अपवादात येते. अशा प्रकारे म्हटले जाऊ शकते की, संपरीक्षा न्यायालयाने हे प्रकरण आकस्मिक भांडणातून संतापाच्या भरात आकस्मिकपणे मारामारी सुरु झाली असता पूर्व नियोजित नसतांना झालेला सदोष मनुष्यवध असे अधिनिर्णित केले आहे.

८. या याचिकेच्या समर्थनार्थ विद्वान वकील श्री. काटे यांनी असे सादर केले की अभियोग पक्षाने तक्रार दाखल करण्यात झालेल्या सहा महिन्यांच्या अवास्तव विलंबाचे स्पष्टीकरण दिले नाही जे स्वतःच प्रकरण अनिश्चित आणि संशयास्पद बनवते. त्यांनी असे सादर केले की अपिलार्थीला आरोपी म्हणून दोषी ठरवण्यात आले होते, मयत व्यक्तीच्या वडिलांना संशय आल्यानंतरच, त्याच्या मुलाच्या मृत्यूवरून गैरव्यवहार झाला, ज्याची सुरुवातीला अपघाती मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली होती. असे सादर करण्यात येते की अभियोग पक्षाने योग्य तथ्ये अभिलेखावर आणली नाहीत, जी अन्यथा त्यांच्या आवाक्यात होती. असे सादर करण्यात येते की, अभियोग पक्षाने मयत व्यक्तीला ई. एस. आय. एस. रुग्णालयात दाखल करताना कंपनीने रुग्णालयाला उद्देशून लिहिलेले पत्र जप्त केले नाही. निवेदनाच्या समर्थनार्थ, अपीलकर्त्याचे विद्वान वकिलांनी डॉ. सीता-अभियोग साक्षीदार -७ यांच्या पुराव्यावर भर दिला होता, ज्यांनी साक्ष दिली की पत्रान्वये, मयत व्यक्तीला तीव्र उलट्यांनंतर चक्कर येत असल्याचे सांगण्यात आले होते.

त्यामुळे हे पत्र सादर केले गेले असते, तर त्यात अस्पष्टता न बाळगता अभियोग प्रकरण पूर्णपणे उघड झाले असते. अपीलकर्त्याचे विद्वान वकील श्री. काटे यांनी सादर केले की मयत व्यक्तीच्या वडिलांनी आपल्या साक्षीत आपल्या मुलाच्या मृत्यूबद्दल गैरप्रकार झाल्याचा संशय व्यक्त केला नाही आणि त्यामुळे अशोक कापसे यांना प्रत्यक्षदर्शी म्हणून बसवण्याची शक्यता नाकारता येत नाही, जेणेकरून कंपनीला संबंधित कायद्यांनुसार मयत व्यक्तीला नुकसान भरपाई देण्याच्या जबाबदारीमधून मुक्त करता येईल, कारण ते कंपनीच्या आवारात काम करत असताना मरण पावले होते. असेही सादर करण्यात आले आहे की, मयत व्यक्तीचा नैसर्गिक मृत्यू झाला, कारण संबंधित वेळी तो अत्यंत आजारी होता. या निवेदनाच्या समर्थनार्थ, अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलांनी शवविच्छेदन शल्यचिकित्सक डॉ. प्रकाश आंबेकर यांच्या पुराव्यावर भर दिला आहे. या आधारावर त्यांनी अपीलकर्त्याच्या निर्दोष मुक्ततेची मागणी केली आहे.

९. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी दोषसिद्धी आणि शिक्षेचे समर्थन केले आहे.

१०. मी अपीलकर्त्याच्या वकिलांच्या निवेदनाचा बारकाईने विचार केला आहे आणि सहाय्यक सरकारी वकिलांनी पुराव्याचा अभ्यास केला आहे.

११. २८ ऑगस्ट १९८९ रोजी कंपनीच्या आवारात ही कथित घटना घडली होती, यात वाद नाही, परंतु २३ फेब्रुवारी १९९० रोजी गुन्हा नोंदवण्यात आला. अधिकाऱ्याने दाखल केलेली तक्रार असे सूचित केले आहे की मयत व्यक्तीच्या वडिलांना त्याच्या मुलाच्या मृत्यूबद्दल गैरप्रकार झाल्याचा संशय होता आणि त्यानंतर त्यातून संकेत घेत, अभियोग साक्षीदार -५ या सहकाऱ्याचा जबाब नोंदवला गेला आहे, जो अपीलकर्त्याने मयत व्यक्तीवर बुक्क्याने वार केल्याच्या हल्ल्याचा प्रत्यक्षदर्शी असल्याचा दावा करतो .अभियोग पक्षाने मुख्यत्वे अभियोग साक्षीदार -५ च्या साक्षीवर भर दिला आहे.मी त्याच्या साक्षीचे अवलोकन केले आहे.तथापि, असे म्हटले जाऊ शकते की

अभियोग पक्षाने हे सिद्ध केले नाही की घटना घडल्याच्या तारीख आणि ठिकाणी प्रत्यक्षदर्शी उपस्थित होता. प्रत्यक्षदर्शी जरी सिमेन्स कंपनीच्या आस्थापनेवर सह -कर्मचारी होता, तरी अभियोग पक्षाने त्याची उपस्थिती दर्शविण्यासाठी आणि ते सत्यापित करण्यासाठी हजेरी पट (मस्टर रोल ) जप्त करण्याचे प्रयत्न केले नाहीत. त्याची उपस्थिती सिद्ध करणे इतके अत्यावश्यक होते, कारण सुरुवातीला मृत्यूचे कारण अपघाती मृत्यू असल्याची चौकशी करण्यात आली होती.सह-कर्मचार्याचा (प्रत्यक्षदर्शी) जबाब केव्हा नोंदविला गेला हे माहीत नाही.हे मान्य आहे की तत्क्षणी पर्यवेक्षक असलेल्या बाळासाहेबांचा जबाब नोंदवला गेला असला तरी अभियोग पक्षाने त्यांची चौकशी केलेली नाही. त्यामुळे, हा साक्षीदार कंपनीच्या आवारात किती काळ उपस्थित होता हे माहीत नाही.अभियोग पक्षाने कामगार कंत्राटदाराची चौकशी केली असली तरी अशोक कापसे-अभियोग -५ हे त्यांच्या करारानुसार काम करत होते असे त्यांनी म्हटले नाही.तपासाच्या अभिलेखावरुन हे स्पष्टपणे सूचित करतात की पर्यवेक्षक बाळासाहेब भोसले घटनास्थळी उपस्थित होते आणि त्यांनीच मयत व्यक्तीला रुग्णालयात नेले होते.मरणोत्तर पंचनामा करताना बाळासाहेब भोसलेही उपस्थित होते.मात्र, अभियोग पक्षाला हे चांगल्याप्रकारे माहीत असल्यामुळे त्याची चौकशी झाली नाही.बाळासाहेबांव्यतिरिक्त खंडू बनसोडे हे देखील मयत व्यक्तीला रुग्णालयात नेण्यात आले तेव्हा उपस्थित होते. मयत वडिलांच्या साक्षीवरून असे दिसून येते की खंडू बनसोडे यांनी त्यांना सांगितले की, तंबाखू चघळत असताना आणि तीव्र उलट्यांमुळे त्यांच्या मुलाचा मृत्यू झाला. अशा प्रकारे, या साक्षीदाराची साक्ष स्पष्टपणे दर्शवते की मृत्यूचे कारण त्याच्या माहितीमध्ये होते. मात्र, खंडू बनसोडे यांनी हे कळवले नाही की एका वादामुळे अपीलकर्त्याने मयत व्यक्तीला मारहाण केली. यामुळे अभियोग पक्षाचे प्रकरण अनिश्चित होते. असे म्हटले जाऊ शकते की जरी अभियोग पक्षाने असा दावा केला असेल की मयत व्यक्तीच्या वडिलांना हत्येचा संशय होता, परंतु त्याचा पुरावा स्पष्ट आणि साधा आहे. ते त्याच्या

मुलाच्या मृत्यूबद्दल काहीही बोलले नाही; मग तो मनुष्यवध असो, अपघाती असो किंवा इतर. उपरोक्त तथ्यांच्या पार्श्वभूमीवर, प्रत्यक्षदर्शींचा पुरावा हा या न्यायालयाचा आत्मविश्वास वाढविणारा नाही. या परिस्थितीत अभियोग पक्षाने घटनेच्या ठिकाणी प्रत्यक्षदर्शी उपस्थित होते हे सिद्ध करायला हवे होते आणि अभियोग साक्षीदार या घटनेचा साक्षीदार असल्याचे अभियोग पक्षाला केव्हा कळले याबद्दल अधिक स्पष्टीकरण देणे अपेक्षित होते. खरे तर, प्रत्यक्षदर्शी देखील सह-कर्मचारी होता आणि कंपनीच्या आस्थापनेवर काम करत होता आणि त्यामुळे घटनेनंतर लगेचच गुन्हा नोंदवणे हे अभियोग पक्षाच्या आवाक्याबाहेर होते. अशा प्रकारे पुरावे एकत्रितपणे वाचल्यानंतर, माझ्या मते, न्याय्य आणि योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी अभियोग पक्षाने भौतिक तथ्ये अभिलेखावर आणले नाहीत. अन्यथा, शवविच्छेदन शल्यचिकित्सकाचा पुरावा असेही सूचित करतो की मयत व्यक्तीची प्लीहा मोठी झाली होती आणि अधोरेखित विकृतिविज्ञानाच्या दृष्टीने प्लीहा फुटणे शक्य होते.

१२. संपूर्ण पुराव्याचा विचार करता, माझ्या मते, अभियोग पक्षाने वाजवी संशयाच्या पलीकडे हे सिद्ध केले नाही की आरोपींनी अचानक झालेल्या भांडणाच्या आवेशात मयताच्या पोटावर मुठीने वार केले. अशा प्रकारे नमूद केलेल्या कारणांमुळे, ठाणे येथील तृतीय अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी सत्र प्रकरण क्रमांक २९८/१९९० मध्ये दिलेली आक्षेपित दोषसिद्धी आणि शिक्षा रद्द करण्यात येत आहे आणि बाजूला सारण्यात येत आहे.

१३. अपिल मान्य करण्यात येत आहे. अपीलकर्त्याचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. हमीदारांना मुक्त करण्यात येत आहे . दंड भरलेला असल्यास तो अपीलकर्त्यास परत करण्यात यावा.

१४. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**(न्यायमूर्ती संदीप के. शिंदे)**

********

<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल."

********